University of Mumbai

मुंबई विद्यापीठ

UNIVERSITY COMPUTERISATION CENTRE

214, (Second Floor), Dr. Shankar Dayal Sharma Bhavan, Vidyanagari Campus, Santacruz (East), Mumbai - 400 098. Tel. No. 2652 97 70, 2652 79 58/59 Ext.: 654

Website : http://www.mu.ac.in Email : ucc@umail.mu.ac.in

No. UCC e-charges/190/of 2004. March 8, 2004.

## CIRCULAR :

Sub: Remittance of University share of the e-charges collected from the students enrolled in the Affiliated Colleges, Institutions, including I.D.E. and the University Departments.

Sir, Madam,

A reference is invited to this Office Circular No. UG/199 of 2002, dated May 7, 2002 and No. UCC/e-charges/65 of 2003 dated July 11, 2003, respectively about the collection of the e-charges of Rs.20/- per year from every student and to deposit the 50% of this amount to the University and the remaining 50% to be retained by the College for exclusive use of maintaining the e-mail and net connectivity as communicated therein.

The Principals of the affiliated colleges (including the engineering colleges), the Heads of the University Departments, Institutes (including IDE) are therefore hereby requested to take further follow up action in this regard. It is also requested to submit the details of the fund collected from the students and utilized by them in the following format.

| Sr.No. | Name of the College/ Department/ Institute | e-charges fees collected so far by the College/ Department/ Institute | | Amount spent for Infrastructure development by the College/ Department/ Institute (Give details) | | Amount of fees deposited from the respective College/ Department/ Institute to the University. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2002-03 | 2003-04 | 2002-03 | 2003-04 | 2002-03 | 2003-04 |

They are further informed that the University share of e-charges as per the students strength should be sent to the University by means of DD/Pay Order/Crossed Cheque drawn in favour of the Finance & Accounts Officer, University of Mumbai, immediately.

Dr. Sudhir Panse
Director BCUD & UCC.

To the Principals of the Affiliated Colleges, Institutions, IDE and the Heads of the University Departments.

Copy for information to the Finance & Accounts Officedr, The Dy. Registrar (UG), The PA to the VC, PVC, and the Registrar.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणा-या विविध शैक्षणिक संस्थांमार्फत शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना "ई-सुविधा" उपलब्ध करुन देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : ई सेवा २००६/(१९५/०६)/मशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ जून, २००६.

प्रस्तावना: राज्यातील उच्च, तंत्र व कला शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित विविध शैक्षणिक माहिती, प्रशासकीय माहिती, तसेच स्पर्धा परीक्षा व रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधीची माहिती आवश्यक असते. सदर माहिती एकाच ठिकाणी व एकाच वेळी उपलब्ध नसल्याने ती प्राप्त करुन घ्यावयास विद्यार्थ्यांना श्रम, वेळ व पैसा खर्च करावा लागतो. विद्यार्थ्यांना येणा-या या विविध अडचणी विचारात घेता विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सदर व अन्य विविध सुविधा तसेच एकविसाव्या शतकातील आधुनिक शिक्षण प्रणालीचा लाभ महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना देण्यासाठी अभिनव "ई-सुविधा" उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर ई-सुविधांमध्ये विद्यार्थ्यांशी [illegible] शैक्षणिक बाबी, प्रशासकीय सुविधा इत्यादी अपेक्षित आहेत.

या "ई-सुविधा" सर्व अकृषी विद्यापीठे, त्यांच्या अखत्यारित येणारी सर्व संबंधित महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनामार्फत विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. या ई-सुविधांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेशासाठी लागणा-या माहितीपासुन पदवी/पदविका प्रदानांपर्यन्तच्या माहितीचा समावेश टप्याटप्याने करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध संस्था, त्यामधील अभ्यासक्रम, शिष्यवृत्या अन्य सवलतींचे [illegible], विविध शासकीय योजनांच्या लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज, स्पर्धा परीक्षांचे अर्ज, परीक्षांची वेळापत्रके, मागील वर्षातील प्रश्नपत्रिका, निकाल प्रमाणपत्रे इत्यादी अनेक सुविधा देता येणे शक्य होईल.

या ई-सुविधांमुळे उच्च गुणवत्तेच्या शैक्षणिक सेवा विद्यार्थ्यांना माफक शुल्कात मिळाल्यामुळे त्याबाबतच्या त्यांच्या खर्चात तसेच वेळेत बचत होण्यास मदत होणार आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्षातील विविध टप्प्यातील माहितीच्या उपलब्धतेतील विलंब टळून त्याचा नाहक त्रास दूर होऊ शकेल. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरी विद्यार्थ्यांप्रमाणे सुविधा उपलब्ध होऊन करीअरच्या समान संधी त्यांना प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न करता येईल.

सदर प्रयोजनार्थ महाराष्ट्र ज्ञान महामंडळीची स्थापना देखील यापूर्वी शासनाने या विभागांतर्गत केली आहे. सदर महामंडळाने उपरोक्त सुविधा देण्याकरिता डिजिटल युनिव्हर्सिटी, डिजिटल कॉलेज व डिजिटल डायरेक्टरेट या तीन सॉफ्टवेअर प्रणाली आतापर्यंत विकसित केल्या आहेत. सदर ई सुविधांसाठी विद्यापीठ व संचालक पातळीवर अत्याधुनिक सर्व्हर यंत्रणा विद्यापीठ व संचालनालयाव्दारे कार्यान्वित करुन ते सर्व महाविद्यालये / तंत्रनिकेतने, सह संचालक कार्यालयाच्या सर्व्हर्सना जोडणे अपेक्षित आहे.

या संदर्भात राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाचे कुलगुरु, विभागांतर्गत येणा-या संचालनालयाचे प्रतिनिधी आणि सदर महामंडळाचे पदाधिकारी यांच्या समवेत मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी दिनांक ०६ जून, २००६ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत एकमताने ठरविल्याप्रमाणे उच्च व तंत्रशिक्षण घेणा-या राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त विविध सुविधा माफक शुल्क आकारुन उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: १. उपरोक्त पार्श्वभूमीवर चालू शैक्षणिक वर्षापासून (सन २००६-०७) विद्यार्थ्यांना "ई-सुविधा" महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यास येत आहे. ही सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विभागांतर्गत येणा-या सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांना संलग्न शासकीय/अशासकीय/अनुदानित/विना अनुदानित/कायम स्वरुपी विना अनुदानित अशा सर्व महाविद्यालय, तंत्रनिकेतन व अन्य शैक्षणिक संस्थांमार्फत संचालित करण्यात येणा-या पदवी/पदविका/पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणा-या प्रतिवर्षी प्रतिविद्यार्थी रुपये ५०/- (अक्षरी रु. पन्नास फक्त) याप्रमाणे शुल्क इतर शुल्क या शीर्षाखाली "ई-सेवा शुल्क" म्हणून आकारण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. शासन पुढे असेही आदेश देत आहे की, प्रथम सन २००६-०७ मध्ये वरीलप्रमाणे शुल्क आकारण्याची सुरुवात करुन त्यानंतर नैसर्गिक वाढीने पदवी/पदविका/पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंत सदर शुल्क प्रतिवर्षी आकारण्यात येईल. अशा प्रकारे जमा होणारे "ई-सेवा शुल्क" संबंधित महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून जमा करुन ते विद्यापीठाकडे जमा करावे व ज्या महिन्यात "ई-सेवा शुल्क" जमा केले असेल त्याच्या पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत प्रत्येक विद्यापीठाने ही रक्कम एकत्रित स्वरुपात महाराष्ट्र ज्ञान महामंडळास प्रति विद्यार्थी रु. ५०/- प्रमाणे प्रत्यक्ष अदा करावी.

३. सदर योजनेच्या अंमलबजावणीचा सविस्तर तपशील संबंधित विद्यापीठ व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांच्या दरम्यान परस्पर सामंजस्याचा करार करुन त्यामध्ये समाविष्ट करण्यात यावा, असे आदेश देण्यात येत आहे. तसेच सदरचा सामंजस्याचा करार हा दि. ३०/०६/२००६ पर्यंत करुन त्यातील तरतूदींची माहिती सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांना सत्वर करुन देण्यात यावी. तसेच या योजनेची अंमलबजावणी दि. १५ ऑगस्ट, २००६ पासून सर्वत्र करण्यात यावी. सदरची संपूर्ण प्रक्रिया रितसर व पारदर्शीपणे करारातील विहित पध्दतीनुसार राबविण्याची जबाबदारी सर्व संबंधित संस्था व अधिका-यांची राहील.

४. सदर निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ३८२/२००६/व्यय-५, दि. १५ जून, २००६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही
(सु.न. जोशी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन